लोकमत

धडगाव तालुक्यातील नंदलवड येथे डॉक्टरांची धडपड

# नदीतून धावले डॉक्टर अन् मातेची सुखरूप प्रसूती

सुख 'वार्ता'

भूषण रामराजे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** धडगाव तालुक्यातील सातपुड्याच्या अतिदुर्गम भागातील नंदलवड पावरापाडा येथील मातेच्या प्रसवकळा सुरू असताना रुग्णवाहिका पोहोचू शकत नसल्याने सोन बुद्रूक येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने नदीपात्रातून धावत प्रवास करत उपचार दिले. या उपचारातून मातेने जुळ्यांना जन्म दिला आहे.

गुंज्या भरत वसावे या मातेला १२ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता प्रसवकळा सुरू होत्या. याबाबत सोन बुद्रूक प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्तव्यावर असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष पावरा यांना आशा कार्यकर्ती सुनंदा वळवी यांनी माहिती दिली होती.



## एक बाळ घरीच जन्मले...

- डॉ. पावरा हे चारचाकी वाहनाने पावरापाडा जवळील नदीपर्यंत पोहोचले होते. परंतु, नदी पार करून पाडा असल्याने त्यांनी रुग्णवाहिका बोलावून घेत पाड्यावर पायी प्रवास सुरु केला. नदीला पाणी असतानाही हातात ग्लोव्हज घालून महिलेचे घर गाठले होते. यादरम्यान मातेच्या गर्भाशयातून एक बाळ बाहेर येऊन डोके दिसत होते.

मातेच्या घरी पोहोचल्यानंतर आधी डोके बाहेर आलेल्या बाळाची डिलिव्हरी करून घेतली होती. परंतु, दुसरे बाळ गर्भात असल्याने त्यांनी तातडीने ग्रामस्थांच्या मदतीने झोळी करून घेत मातेला पुन्हा आलेल्या मार्गानेच प्रवास सुरु केला. काही मिनिटांत मातेला मुख्य रस्त्यावरील रुग्णवाहिकेत आणत रुग्णालयात हलवले.

## संवाद साधून धीरही देत होते

- धडगाव ग्रामीण रुग्णालयात आणून दुसऱ्या बाळाची सुखरूप प्रसूती करण्यात आली. धडगाव ग्रामीण रुग्णालयातील डॉ. बाबूलाल पावरा आणि डॉ. संतोष परमार यांनी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली होती. झोळीतून नदीतून प्रवास सुरु असताना डॉ. पावरा हे मातेसोबत संवाद साधून तिला धीर देत होते. डॉ. पावरा स्वत:च्या वाहनाने नंदलवडला पोहोचले होते.

## ग्रामीण रुग्णालयात सुखरूप

- ग्रामीण रुग्णालयात डॉ. बाबूलाल पावरा आणि डॉ. परमार यांनी गर्भात अडकलेल्या दुसऱ्या बाळाची सुखरूप प्रसूती केल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची धावपळ थांबली होती. दरम्यान जिल्ह्यातील आरोग्य केंद्रात माहेरघर योजना सुरु असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र सोनवणे यांनी दिली आहे.

# ‘Bamboo-lance’ rescues woman in labour from remote hamlet in Maharashtra’s Nandurbar

**In the absence of roads, the sick and infirm are carried to the nearest Primary Health Centre in a makeshift stretcher with two ends of bedsheets tied to bamboo sticks**

Updated - September 15, 2024 06:33 pm IST - MUMBAI

PURNIMA SAH



On the morning of September 12, 2024, medical officer Subhash Pavara was carrying out regular check-ups of patients at the Primary Health Centre (PHC) in Son village of Dhadgaon taluk in Maharashtra’s Nandurbar district when he received an urgent call from ASHA (Accredited Social Health Activist) worker Sunanda Valvi. A 23-year-old woman had gone into premature labour at 32 weeks at Nandlawad, a remote hamlet cut off from roads and transport, which medical staff could reach only by traversing dirt tracks and streams for hours.

"The ASHA worker, stressing the severity of the mother's condition, said it was impossible to transport her to the hospital. I immediately took my personal car and drove towards the hamlet. Due to poor network connectivity in the region, we could not contact an ambulance. I managed to reach Dhadgaon Rural Hospital and requested Dr. Babulal Pavara and Dr. Santosh Parmar, who were on duty, to arrange an ambulance. On approaching the village, we realised there was no road for a car or ambulance to reach the patient's hut," Dr. Pavara said.

Nandurbar, a tribal dominated district, is located at the edge of Maharashtra's northern boundary in the Satpura hill range, with Madhya Pradesh to the north and Gujarat to the west. NITI Aayog's multi-dimensional poverty index score shows an improvement from 52.12% in 2015-16 to 33.17% in 2019-21 for the region, but the district remains the poorest in the State.

Villagers here carry sick people to the nearest PHC in 'bamboo ambulances' or 'bamboo-lances' — a makeshift stretcher with two ends of bedsheets tied to bamboo sticks is a common sight. The 17 lakh population here, according to the District Collector's data, faces numerous healthcare challenges due to a scattered demographic and difficult topography.

Meanwhile, Dr. Pavara received another update from the ASHA worker, who said the mother was about to deliver. Dr. Pavara, along with another ASHA worker Indira Pavara, ran on foot to reach Nandlawad. The first of twins was delivered in the patient's hut. "The second baby was still inside the mother's womb. Relatives carried the mother in a 'bamboo-lance' to the road for an hour, where the ambulance was waiting, to transfer the patient to Dhadgaon Rural Hospital, 14 km away," Dr. Pavara said.

The second of the twin babies was delivered successfully upon reaching the hospital.